# शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर

( महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)

विद्यानगर, जुना पुणे - बेंगलोर महामार्ग, कृषी महाविद्यालयासमोर, कोल्हापूर – ४१६००४

दुरध्वनी क्र. (०२३१)२६२१०३८ फॅक्स क्र. २६२१०१६ gpkolhapur@yahoo.com


## कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालय, नवी दिल्ली, भारत सरकार यांचे उपक्रम अंतर्गत

## दिव्यांग ( अपंग ) व्यक्तींसाठी प्रथम वर्ष २०२१-२२ अभियांत्रिकी पदविका (Diploma Engineering) प्रवेश

शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर येथे केंद्रशासन पुरस्कृत दिव्यांग (अपंग) प्रशिक्षण योजनेअंतर्गत प्रथम वर्ष पदविका अभियांत्रिकी स्थापत्य - ०५, यंत्र - ०५, विद्युत - ०५, माहिती तंत्रज्ञान - ०५ अशा एकूण २० जागेसाठी इयत्ता १० वी पास दिव्यांग (अपंग) विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येणार आहे. सदरहू प्रवेशासाठी दिव्यांग (अपंग) विद्यार्थी एस.एस.सी. परिक्षेत किमान ३५% गुणास उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. तसेच किमान ४०% दिव्यांग (अपंग) असल्याचा जिल्हा रुग्णालयाचा दाखला असणे आवश्यक आहे. अभ्यासक्रमासाठी प्रवेश हा सामान्य उमेदवारांसाठी तंत्र शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदविका प्रवेश नियमावली प्रमाणे व संस्थेमध्ये व्ही. आर. सी. मुंबई यांचेमार्फत घेण्यात येणा-या वैद्यकिय चाचणीनुसार देण्यात येईल. या योजने अंतर्गत प्रवेशार्थीस शैक्षणिक फी माफी, मोफत वसतिगृह, भोजन भत्ता, पुस्तके व स्टेशनरी साठी भत्ता इत्यादी सोयी सवलती केंद्र शासनाच्या नियमानुसार देण्यात येतील.

प्रवेशासाठी दिव्यांग (अपंग) विद्यार्थ्यांनी सामान्य विद्यार्थ्यांसाठी असणा-या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रीयेसाठी ( Online Registration ) www.dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळावरून माहिती घेवून अर्ज करावा. सुविधा केंद्राकडुन ( Facilitation center ) देण्यात येणा-या पोचपावतीची दुय्यम प्रत व हस्तलिखित अर्ज आपल्या दुरध्वनी क्रमांकासह प्रत्यक्ष अथवा पोस्टाने अर्ज भरलेनंतर सात (०७) दिवसाच्या आत शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर येथे सादर करावा. **या संस्थेमधे असे अर्ज प्राप्त झालेले इच्छुक दिव्यांग (अपंग) विद्यार्थीच प्रवेशासाठी पात्र राहतील**. या विद्यार्थ्यांनी वैद्यकीय चाचणी व प्रथम फेरी प्रवेश प्रक्रियेसाठी संस्थेत मुळ कागदपत्रे व इतर शुल्क (अंदाजे रू. ३०००/-) सह त्यांच्या दुरध्वनीवर कळविणेत येणा-या दिवशी सकाळी ११.०० वाजता हजर रहावे.

प्राचार्य,
शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर